# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

क्र.मासविक/आयसीडी/२०२१—२२/७

वाचा :— परिपत्रक क्र.वि.व.ले/वेतन/आयसीडी/२०१८—१९/४४५/२०१८, दिनांक ३१मे, २०१८

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, ठाणे उपपरिसर, समन्वयक, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अॅड अॅपलाईड सायन्ससेस, कल्याण उपकेंद्र, सर्व उपकुलसचिव, स्था. नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये वेतन विभागास विद्यापीठातील कर्मचा—यांचा प्रत्येक महिन्याचा हजेरीपट महिन्याच्या ५ तारखेच्या आत विभागप्रमुखांमार्फत पाठविण्याबाबत अवगत करण्यात आले होते.

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, वेतन विभागास विहित कालावधीत स्थायी कर्मचा—यांचा उपस्थिती अहवाल प्राप्त होत नसल्याने वेतन विभागस कर्मचा—यांचा वेतन काढण्यास अडचणी निर्माण होतात. आपल्या अधिनस्त असलेल्या स्थायी कर्मचा—यांचा उपस्थिती अहवाल (Staff Changes) **महिन्याच्या पाच तारखेच्या आत** वेतन विभागात पाठविण्याची व्यवस्था करावी. जेणकरुन कर्मचा—यांचे वेतन अदा करण्याबाबत वेतन विभागास वेतन बील शासनाच्या मुदतीत प्रस्तुत करणे सुलभ होईल. तसेच कर्मचा—यांचे रजेचे अर्ज विभागाकडून विलंबाने प्राप्त होतात असे निदर्शनास आले आहे, तरी प्रशासनाच्या आदेशानुसार संबंधित **कर्मचा—यांच्या उपस्थितीच्या अहवालासोबत अनुपस्थितीच्या कालावधीचे रजेचे अर्ज** उपकुलसचिव, मानव संसाधन विकास कक्ष—३, फोर्ट, मुंबई—४०० ०३२ त्वरीत या विभागास सादर करण्यात यावेत. सदर अहवाल प्राप्त न झाल्यास त्याची जबाबदारी विभाग प्रमुखांची राहील.

सदर बाब सर्व संबधीत कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचा—यांच्या निदर्शनास आणून दयावी.

प्रभारी कुलसचिव

मुंबई—४०००३२
२२जून, २०२१